**जिल्हाधिकारी बीड यांचे कार्यालय**
**(पुरवठा विभाग.)**

---

जा.क्र.२०१३/एसबी/डेस्क/जिग्रासंप/
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.
दिनांक: २२/११/२०१३.

## जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीबाबतची जाहीरात.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकिय सदस्यांच्या नियुक्ती करणेबाबत शासन निर्णय क्र.ग्रारांप-१०१३/प्र.क्र.११९/ग्रासं-२,दि.१९.१०.२०१३ अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,मुंबई नूसार बीड जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवर एकूण २८ अशासकिय सदस्यांची निवड करावयाची आहे. अशासकिय सदस्यांच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी, बीड | अध्यक्ष |
| २. | पोलीस अधिक्षक, बीड | सदस्य |
| ३. | जिल्हा ग्राहक मंचचे अध्यक्ष,बीड | सदस्य |
| ४. | जिल्हा पुरवठा अधिकारी,बीड | निमंत्रक |

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकिय सदस्यांचा प्रवर्गनिहाय तपशील पुढीलप्रमाणे.

१. जिल्हा परिषदेचे दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
२. महानगर पालिका/नगरपरिषदांचे दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
३. पंचायत समितीचे दोनपेक्षा कमी नसतील इतके सदस्य.
४. कृषी उत्पन्न बाजार समितीचे दोनपेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी.
५. ग्राहक संघटनांचे दहापेक्षा कमी नसतील इतके प्रतिनिधी.
६. शाळा/महाविद्यालये यांचे दोनपेक्षा कमी नसतील इतक्र प्रतिनीधी.
७. वैद्यक व्यवसायाचे दोनपेक्षा कमी नसतील इतके प्रतिनीधी
८. व्यापार व उद्योग क्षेत्रातील दोनपेक्षा कमी नसतील इतके प्रतिनीधी.
९. पेट्रोल व गॅस विक्रेत्यांचे दोनपेक्षा कमी नसतील इतके प्रतिनीधी.
१०).शेतक-यांचे दोनपेक्षा कमी नसतील इतके प्रतिनीधी.

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदांवर अशासकिय सदस्यांची निवड वरिल निवड समितीमार्फत करण्यात येईल. निवड झालेल्या अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयातून निर्गमित केले जातील.

वरिलप्रमाणे नमूद अशासकिय सदस्यांचे जागेसाठी पात्र असणारे अर्जदार यांनी शासन निर्णयामध्ये नमूद परिशिष्ट अ मधील विहित नमुन्यात परिशिष्ट ब मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेवरील अशासकिय सदस्य पदासाठीचे अर्ज या जाहीरातीचे दिनांकापासून ३० दिवसात संबंधित तहसिल कार्यालयात दाखल करावेत. आवेदन पत्राचा नमुना परिशिष्ट अ व सोबत जोडावयाचे कागदपत्रांची यादी परिशिष्ट ब व शासन निर्णय संबंधित तहसिल कार्यालयात मिळतील.

मा.जिल्हाधिकारी, बीड
यांचे मान्यतेवरुन/-

जिल्हाधिकारी, बीड
तथा अध्यक्ष जिल्हा निवड समिती,
जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद,
जिल्हा बीड करिता.